# शिवाजी विद्यापीठाला 'आयएसओ' मानांकन

## देशातील चौथे, राज्यातील पहिले अकृषी राज्य विद्यापीठ ठरले

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

जागतिक स्तरावर उत्कृष्टतेचा मापदंड निश्चित करणाऱ्या 'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टँडर्डायझेशन' (आयएसओ) या संस्थेकडून येथील शिवाजी विद्यापीठाला सर्वंकष शैक्षणिक गुणवत्तेसाठी 'आयएसओ- ९००१:२०१५' मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. हे प्रमाणपत्र प्राप्त करणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील चौथे आणि राज्यातील पहिले अकृषी राज्य विद्यापीठ ठरले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेमध्ये ही माहिती दिली.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह टयू सूद साऊथ एशिया प्रा. लि. कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी, सहायक व्यवस्थापक अनिल साळवी आणि कोल्हापूर विभागाचे शाखाधिकारी सुजित पाटील उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शैक्षणिक प्रशासन, अभ्यासक्रमांची रचना व निर्मिती, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन प्रकल्प, शैक्षणिक उपयोजन व नवतंत्रज्ञानाचा वापर, मूल्यांकन व मूल्यमापन, संबंधित घटकांशी सहसंबंध, परीक्षाविषयक कार्यपद्धती व सुधारणा, निकालाची प्रक्रिया तसेच पदवी प्रदान प्रक्रिया आदी विविध बाबींची सर्वंकष पाहणी करून 'आयएसओ'विषयक पाहणी करणाऱ्या संस्थेने शिवाजी



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना आयएसओ प्रमाणपत्र प्रदान करताना टयू सूद कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी आदी. (छाया : पांडुरंग पाटील)

विद्यापीठाला 'आयएसओ ९००१:२०१५' प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला. यापूर्वी राज्यातील विद्यापीठांमध्ये असलेल्या विविध अधिविभाग, विभागांनी स्वतंत्रपणे असे प्रमाणपत्र प्राप्त केले आहे; पण संपूर्ण विद्यापीठ म्हणून प्रमाणपत्र प्राप्त करणारे शिवाजी विद्यापीठ राज्यातील पहिलेच ठरले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने दर्जावृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न चालवले आहेत. पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यापासूनच ही प्रक्रिया सुरू झाली, ती आजतागायत अव्याहतपणाने सुरू आहे.

यावेळी विद्यापीठाच्या आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत म्हणाले, इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टँडर्डायझेशन ही संस्था जगभरातील विविध वस्तू, सेवा आणि संस्था यांच्याशी निगडित गुणवत्तेचे, दर्जाचे मूल्यांकन करणारी आघाडीची आणि अत्यंत विश्वासार्ह संस्था आहे. 'आयएसओ' सर्टिफिकेशन करून देणाऱ्या अनेक कंपन्या आहेत. तथापि, गुणवत्तेसाठी अत्यंत आग्रही असणाऱ्या जर्मनीच्या 'टयू सूद' या कंपनीकडून तपासणी करून घेण्यास शिवाजी विद्यापीठाने प्राधान्य दिले, हे यातले महत्त्वाचे वैशिष्ट्य आणि वेगळेपण आहे. सध्याचे प्रमाणपत्र हे ९ सप्टेंबर, २०१९ ते ८ सप्टेंबर २०२२ या तीन वर्षांच्या कालावधीसाठीचे आहे; मात्र या कंपनीकडून वर्षातून दोनदा विद्यापीठाचे मूल्यमापन करण्यात येणार आहे.

पत्रकार परिषदेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, अजित चिटे आदी उपस्थित होते.

## शुभवार्ता

### शिवाजी विद्यापीठाला 'आयएसओ' मानांकन

कोल्हापूर : जागितक पातळीवर उत्कृष्टतेचा मापदंड निश्चित करणाऱ्या इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टँडर्डायझेशन या संस्थेकडून आयएसओ ९००१:२०१५ मानांकनांचे प्रमाणपत्र मिळाले. असे मानांकन मिळविणारे राज्यातील पहिले तर देशातील हे चौथे विद्यापीठ ठरल्याचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

▶▶ सविस्तर वृत्त...५

# डॉ. व्ही. ए. पाटील यांची अभ्यास मंडळावर निवड

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

येथील दे. भ. रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांची शिवाजी विद्यापीठाच्या महाविद्यालयीन पदव्युत्तर शिक्षण अभ्यास मंडळावर कुलगुरूंनी निवड केली आहे. ही निवड महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात आली आहे.



कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी यांच्याकडून शिवाजी विद्यापीठाला 'आयएसओ ९००१ :२०१५'प्रमाणपत्र स्वीकारताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सोबतडी. के. गायकवाड, गजानन पळसे, डॉ. आर. के. कामत, प्रकुलगुरू डी टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, पी. डी. राऊत, नमिता खोत आदी

# शिवाजी विद्यापीठाला 'आयएसओ'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

विद्यार्थी केंद्रित उपक्रम, गुणवत्ता, संशोधन आणि मुदतीत परीक्षा निकाल जाहीर करण्याची परंपरा जपत उच्च शिक्षणात वेगळेपण निर्माण केलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. जागितक पातळीवर उत्कृष्टतेचा मापदंड निश्चित करणाऱ्या 'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टॅंडर्डायझेशन'या संस्थेकडून 'आयएसओ ९००१:२०१५'मानांकनांचे प्रमाणपत्र शनिवारी विद्यापीठाला प्रदान करण्यात आले.

असे मानांकन मिळविणारे हे राज्यातील पहिले तर देशातील चौथे विद्यापीठ ठरले आहे. 'आयएसओ प्रमाणपत्रामुळे विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण वाटचाल पुन्हा एकदा ठळकपणे अधोरेखित झाली'असे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

नजीकच्या काळात होणाऱ्या 'नॅक'पाहणीच्या अनुषंगाने हे प्रमाणपत्र महत्वपूर्ण ठरल्याचेही त्यांनी नमूद केले. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने (आयक्यूएसी) महत्वपूर्ण भूमिका बजावली. प्रमाणपत्र वितरणावेळी प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, आयक्यूएसीचे संचालक आर. के. कामत, ट्यू सूद साऊथ एशिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी, सहाय्यक व्यवस्थापक अनिल साळवी, कोल्हापूर विभागाचे शाखाधिकारी सुजित पाटील उपस्थित होते.

दरम्यान आयएसओ मानांकनापुरतीच ही प्रक्रिया थांबणारी नाही. तर या कंपनीकडून वर्षातून दोनदा विद्यापीठाचे मूल्यमापन होणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने ३७ तज्ज्ञ तपासणींची नियुक्ती केली आहे असे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. नमिता खोत, डॉ. डी. के. गायकवाड, वैभव ढेरे उपस्थित होते.

# विद्यापीठाला ‘आयएसओ’ मानांकन

## ‘नॅक’ मूल्यांकनात होणार फायदा; महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाला इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टँडर्डायझेशन (आयएसओ) मानांकन मिळाले.

ट्यू सूद साऊथ एशिया प्रा. लि. कंपनीने मूल्यांकन करून ‘आयएसओ ९००१: २०१५’ मानांकन दिले.

संपूर्ण विद्यापीठाला आयएसओ मानांकन मिळवणारे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पहिले



आणि देशातील चौथे विद्यापीठ ठरले आहे.

मानांकनामुळे पुढील महिन्यात होणाऱ्या ‘नॅक’च्या मूल्यमापनात शिवाजी विद्यापीठाच्या गुणात वाढ

**आयएसओ मानांकनामुळे विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. विद्यापीठाची प्रगती ही सर्वांगीण दृष्टिकोनातून सुरू असल्याचे हे प्रमाणपत्रच आहे. या मानांकनाचा उपयोग ‘नॅक’बरोबरच अन्य मूल्यांकनावेळीदेखील होणार आहे. विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या प्रत्येक घटकाचे हे यश असून, भविष्यातही विद्यापीठाची वाटचाल उत्तुंगतेकडेच राहील.**

– **प्रा. डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

होईल. हे मानांकन तीन वर्षांसाठी असून, प्रत्येक वर्षी कंपनीकडून विद्यापीठाचे मूल्यांकन होणार आहे. आज कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयएसओ मानांकन प्रमाणपत्र देण्याचा कार्यक्रम झाला.

**पान ९ वर »**

# विद्यापीठाला 'आयएसओ' मानांकन

» पान १ वरून

मूल्यांकन प्रक्रियेची माहिती देताना आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत म्हणाले, 'या मूल्यांकनात प्रशासन, अभ्यासक्रमांची निर्मिती व रचना, अध्ययन, अध्यापन प्रक्रिया, संशोधन प्रकल्प, शैक्षणिक उपाययोजना आणि नवतंत्रज्ञानाचा वापर, मूल्यांकन आणि मूल्यमापन, परीक्षा कार्यपद्धती, निकालाची प्रक्रिया, विद्यापीठातील संशोधन या सर्व बाबींचे वर्षभर परीक्षण केल्यानंतर मग हे मानांकन दिले आहे.'

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'विद्यापीठाने दर्जावृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न चालविले आहेत. पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यापासूनच ही प्रक्रिया सुरू झाली, ती आजतागायत अव्याहतपणाने सुरू आहे. ही प्रक्रिया निरंतर असून, ती तशीच सुरू राहण्यासाठी आयएसओसारख्या बाह्य यंत्रणेची तिच्यावर नजर असणे महत्त्वाचे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला शनिवारी आयएसओ मानांकन मिळाले. त्याचे प्रमाणपत्र कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना देताना ट्यू सूद साऊथ एशिया कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी. डावीकडून डॉ. आर. के. कामत, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदिवडेकर, व्ही. टी. पाटील, डॉ. नमिता खोत आदी.

आहे. आता या मानांकनामुळे एक टप्पा आपण गाठला आहे. इथून पुढे हा दर्जा उंचावत नेण्याची जबाबदारी सर्वच संबंधित घटकांवर आहे. त्या जाणिवेतून या पुढील काळात काम होत राहणे आवश्यक आहे. विद्यापीठापासून प्रेरणा घेऊन संलग्नित महाविद्यालये सुद्धा आयएसओला सामोरे जाण्यासाठी सज्ज होतील.'

हे प्रमाणपत्र ९ सप्टेंबर २०१९ ते ८ सप्टेंबर २०२२ या तीन वर्षांसाठी असणार आहे. या कालावधीत कंपनी वर्षातून एकदा विद्यापीठाचे मूल्यांकन करेल.

पत्रकार परिषदेला कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, अजित थिटे, कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी, सहायक व्यवस्थापक अनिल साळवी, शाखाधिकारी सुजित पाटील आदी उपस्थित होते.

### ३७ अंतर्गत लेखापाल

कंपनीने शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापक यांची परीक्षा घेऊन त्यांच्यातील ३७ जणांची निवड अंतर्गत लेखापाल (इंटर्नल ऑडिटर) म्हणून केली आहे. त्यांना प्रशिक्षण दिले असून, विद्यापीठाच्या कारभारावर हे ३७ जण लक्ष ठेवणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 SEP 2019
तरुण भारत

# विद्यापीठाला 'आयएसओ' मानांकन

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती : देशात चौथे तर राज्यात नंबर वन

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिक स्तरावर उत्कृष्टतेचा मापदंड निश्चित करणाऱ्या 'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टॅंडर्डायझेशन'ने (आयएसओ) शिवाजी विद्यापीठाला शैक्षणिक गुणवत्तेसाठी 'आयएसओ-९००१:२०१५' मानांकन प्रमाणपत्र प्रदान केले. हे प्रमाणपत्र प्राप्त करणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील चौथे आणि राज्यातील पहिले अकृषी विद्यापीठ आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

याप्रसंगी ट्यू सूद साऊथ एशिया प्रा.लि. कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी, सहाय्यक व्यवस्थापक (व्यवसाय वृद्धी) अनिल साळवी आणि कोल्हापूर विभागाचे शाखाधिकारी सुजीत पाटील यांची उपस्थिती होती.

प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा दर्जा वाढवण्यासाठी पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यापासूनच आजतागायतच्या कुलगुरूंनी प्रयत्न केले. मानांकनामुळे भविष्यात हा दर्जा उंचावण्याची जबाबदारी सर्वच घटकांवर आहे. आयक्यूएसीचे संचालक डॉ. आर. के. कामत म्हणाले, इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टॅंडर्डायझेशन ही संस्था जगभरातील विविध वस्तू, सेवा आणि संस्थांचे मूल्यांकन करणारी संस्था आहे. सध्याचे प्रमाणपत्र हे ९ सप्टेंबर २०१९ ते ८ सप्टेंबर २०२२ या कालावधीसाठी आहे. या कंपनीकडून वर्षातून दोनदा विद्यापीठाचे मूल्यमापन करण्यात येईल. त्यासाठी विद्यापीठाने सुमारे ३७ तज्ज्ञ अंतर्गत तपासनीसांची फळी निर्माण केली आहे.

प्रास्ताविक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले. यावेळी प्रभारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, डॉ. डी. के. गायकवाड, अजित थिटे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला 'आय.एस.ओ.' मानांकन प्रमाणपत्र कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याकडे सुपुर्द करताना ट्यू सूद साऊथ एशिया प्रा. लि. कंपनीचे सुनील जोशी. सोबत डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. के. कामत, डॉ. विलास नांदवडेकर, गजानन पळसे, व्ही. टी. पाटील, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. नमिता खोत, डॉ. डी. के. गायकवाड, अजित थिटे आदी.

### मानांकन 'नॅक'च्या दृष्टीने महत्त्वाचे

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, शैक्षणिक प्रशासन, अभ्यासक्रमांची रचना व निर्मिती, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन प्रकल्प, शैक्षणिक उपययोजन, नवतंत्रज्ञानाचा वापर, परीक्षेची कार्यपद्धती व सुधारणा, निकालाची प्रक्रिया तसेच पदवी प्रदान प्रक्रिया आदींची समितीने पाहणी केली. त्यानंतर संपूर्ण विद्यापीठाला 'आयएसओ ९००१:२०१५' प्रमाणपत्र दिले आहे. हे मानांकन 'नॅक' मुल्यांकनाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 SEP 2019
तरुण भारत

# विद्यापीठातील शिवाजी पुतळा सुशोभीकरणाला नव्याने प्रारंभ

## कंपाऊंडचे बांधकाम शिवकालीन पद्धतीचे करणार



**कोल्हापूर : छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील आतल्या बाजूला पुरातत्व विभागाच्या परवानगीने कडाप्पा वापरून सुशोभिकरणाला प्रारंभ.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराच्या सुशोभीकरणासाठी शिवकालीन पद्धतीचा दगड वापरावा, या मागणीसाठी कोल्हापूरवासीय शिवभक्त नागरी कृती समितीने आंदोलन केले. ३० मे रोजी झालेल्या बैठकीत आंदोलनापुर्वी खरेदी केलेली कडाप्पा पुतळा परिसराच्या आतल्या बाजूने वापरण्यास पुरातत्वसह कृती समितीने परवानगी दिली आहे. त्यामुळे या कडाप्पांची डिझाईन बदलून सुशोभिकरणाच्या बांधकामास सुरूवात झाली आहे. मात्र परिसराचे कंपाऊंड काळ्या दगडामध्ये किल्ल्याच्या बुर्जावर असणाऱ्या पाकळ्यांच्या आकारात व मराठेशाही किल्ल्यांसारखे करण्यात येणार आहे, अशी माहिती विद्यापीठातील अधिकृत सुत्रांनी दिली.

विद्यापीठात शिवाजी पुतळ्याची स्थापना १९७४ मध्ये केली. हा पुतळा बांधण्यापुर्वी परिसराचे सुशोभिकरण केले होते. तब्बल ४३ वर्षानंतर रूसा अंतर्गत ५० लाख रुपयांचा निधी खर्च करून, शिवाजी पुतळा परिसराचा चेहरा-मोहरा बदलण्याचे काम सुरू केले. पण निकृष्ठ दर्जाच्या कडाप्पांचा वापर केला जात असल्याने कृती समितीने आंदोलन छेडले. त्यामुळे सुशोभिकरणाचे काम गेल्या सहा महिन्यापासून रखडले होते. बऱ्याच बैठकांनंतर ज्या कडाप्पांना विरोध होता, ती कडाप्पा आतल्या बाजूला वापरण्यास परवानगी दिली. त्यामुळे सुशोभिकरणाचे काम नव्याने सुरू केले आहे. मात्र कृती समितीने आंदोलन करून काय साध्य केले, यासंदर्भात विद्यापीठ परिसरात उलट-सुलट चर्चा सुरू आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 SEP 2019
Times of India

# Shivaji University awarded with ISO certification

**Piyush.Bhusari**
@timesgroup.com

File photo



SUK is the first non-agriculture university to get ISO certification in the state

**Kolhapur:** The Shivaji University (SUK) has been awarded with the International Organization for Standardization (ISO) 9001:2015 certification.

Devanand Shinde, vice-chancellor of SUK, said that the SUK is the first non-agriculture university to achieve this in the state and it is fourth ranked among other universities in the country.

Shinde said, "The certification is based on academic administration, syllabi preparation, teaching-learning process, research projects, use of technology, evaluation and assessment, exam related work, improvements, and the degree distribution among others."

He added that various departments of the university have, in past received an ISO certification, but as a whole it getting the certification for the first time. This will be significant in the upcoming National Assessment and Accreditation Council (NAAC) re-accreditation process.

According to Shinde, the Internal Quality Assurance Cell (IQAC) also played a key role in this achievement.

Pro-VC, SUK, D T Shirke, said, "The university is constantly improving. Being Monitored by an external agency proves its importance."

He added that university's achievement hopefully will inspire its affiliated colleges to get their certification.

R K Kamat, Director, IQAC, SUK, on the ISO said, "International Standards works across the world. They give world-class specifications for products, services and systems, to ensure quality, safety and efficiency."

The current certification is valid from September 9, 2019 to September 8, 2022.

The external evaluator from TUV-SUD private company will assess the university twice in an academic year and for which a team of 37 internal auditors have been prepared.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाला 'आयएसओ'

## राज्यात पहिल्या, देशात चौथ्या स्थानांवर भरारी । गुणवत्ता हमी कक्षाकडून महत्त्वपूर्ण भूमिका : देवानंद शिंदे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या यशात शनिवारी आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. विद्यापीठाची सर्वकष पाहणी करून 'आयएसओ ९००१ : २०१५' हे मानांकन मिळाले आहे. हे मानांकन मिळणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील चौथे आणि राज्यातील पहिले अकृषी विद्यापीठ ठरले आहे.

राज्यातील विद्यापीठांमध्ये असलेले विविध अधिविभाग, विभागांनी स्वतंत्रपणे असे प्रमाणपत्र प्राप्त केले आहे; पण संपूर्ण विद्यापीठ म्हणून प्रमाणपत्र प्राप्त करणारे 'शिवाजी' हे राज्यातील पहिलेच ठरले आहे. लवकरच येऊ घातलेल्या 'नॅक' पाहणीच्या अनुषंगाने या मानांकनाचे महत्त्व मोठे आहे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने (आयक्यूएसी) अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी येथे पत्रकार परिषदेत सांगितले. इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टँडर्डायझेशन (आयएसओ) या संस्थेकडून हे मानांकन प्रमाणपत्र दिले जाते.

विद्यापीठाच्या 'आयक्यूएसी'चे संचालक डॉ. आर. के. कामत म्हणाले, 'आयएसओ' ही संस्था जगभरातील विविध वस्तू, सेवा आणि संस्था यांच्याशी निगडित गुणवत्तेचे, दर्जाचे मूल्यांकन करणारी आघाडीची आणि अत्यंत विश्वासार्ह संस्था आहे. परिणामकारकता, कार्यक्षमता आणि कमीत कमी संसाधनांमध्ये जास्तीत जास्त उत्पादकता अशा विविध निकषांवर गुणवत्तेचे निर्धारण या संस्थेकडून करण्यात येते. जगात आणि देशात 'आयएसओ' सर्टिफिकेशन करून देणाऱ्या अनेक कंपन्या आहेत. तथापि, गुणवत्तेसाठी अत्यंत आग्रही असणाऱ्या जर्मनीच्या ट्यू सूद या कंपनीकडून तपासणी करवून घेण्यास शिवाजी विद्यापीठाने प्राधान्य दिले, हे यातील महत्त्वाचे वैशिष्ट्य आणि वेगळेपण आहे. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'आयएसओ'सारख्या मानांकनामुळे एक टप्पा गाठला आहे. पुढे हा दर्जा उंचावत नेण्याची जबाबदारी संबंधित घटकांवर आहे. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील ट्यू सूद साऊथ एशिया कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी, अनिल साळवी, सजित पाटील उपस्थित होते.

### का मिळाले मानांकन

- सातत्यपूर्ण प्रगती करणारा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष
- नावीण्यपूर्ण अभ्यासक्रम राबविणारे विद्यापीठ (तुरुंगातील कैद्यांसाठी अभ्यासक्रम)
- वेळेत निकाल लावण्याची परंपरा
- दुर्मीळ हस्तलिखिते असणारे सुसज्ज ग्रंथालय
- वि. स. खांडेकर संग्रहालयाचे वेगळेपण
- साडेतीन हजार शिक्षकांना प्रशिक्षित करणारे सायबर सिक्युरिटी केंद्र



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना आयएसओ ९००१:२०१५ प्रमाणपत्र प्रदान करताना ट्यू सूद कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी. डावीकडून डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अजित थिटे, अनिल साळ्वी उपस्थित होते.

### अंतर्गत ऑडिटर

सध्याचे प्रमाणपत्र हे ९ सप्टेंबर २०१९ ते ८ सप्टेंबर २०२२ या तीन वर्षांच्या कालावधीसाठीचे आहे. मात्र, ही प्रक्रिया एवढ्यावरच थांबणारी नसून या कंपनीकडून वर्षातून दोनदा विद्यापीठाचे मूल्यमापन करणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने सुमारे ३७ तज्ज्ञ अंतर्गत तपासनिसांची (अंतर्गत ऑडिटर) फळी निर्माण केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 SEP 2019
लोकसत्ता

# 'अतिक्लिष्ट भू-पर्यावरणीय समस्येच्या विश्लेषणाची भूगोल तज्ज्ञांमध्ये क्षमता'

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**अत्यंत क्लिष्ट** भू-पर्यावरणीय समस्येचे विश्लेषण करण्याची क्षमता ही भूगोल विषयाच्या तज्ज्ञ व संशोधकांची मोठी ताकद आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाचे प्राध्यापक डॉ. रवींद्र जायभाय यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त शिवाजी विद्यापीठ भूगोल शिक्षक संघाच्या सहकार्याने आयोजित 'भूपर्यावरणीय समस्या आणि शाश्वत विकास'या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेस आजपासून प्रारंभ झाला. परिषदेचे उद्घाटक या नात्याने डॉ. जायभाय बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. जायभाय म्हणाले, की भूगोल विषयाकडे केवळ सामान्यज्ञानाचा विषय म्हणून पाहण्याची आपल्याला सवय आहे. प्रत्यक्षात पूर, दुष्काळ आदींसारख्या अनेक भू-पर्यावरणीय समस्यांचे नेमके विश्लेषण करण्याची क्षमता त्यात आहे. कला आणि शास्त्र यांचा संगम या विषयात आहे. मानव व पर्यावरण यांच्यातील नातेसंबंधाचे, त्यांतील समस्यांचे विवेचन व निराकरण भूगोलाद्वारेच शक्य आहे.

डॉ. सचिन पन्हाळकर व डॉ. जरग यांनी पंचगंगा नदीच्या भू-पर्यावरणीय समस्यांचा अभ्यास व विश्लेषण याचे सादरीकरण केले.

समन्वयक डॉ. संभाजी शिंदे यांनी स्वागत केले. भूगोल शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. अरुण पाटील उपस्थित होते. डॉ. डी.एच. पवार यांनी आभार मानले.

# शिवाजी विद्यापीठाला ‘आयएसओ’ मानांकन

## राज्यातील पहिले अकृषी राज्य विद्यापीठ; गुणवत्तेवर शिक्कामोर्तब



**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना ‘आयएसओ’ प्रमाणपत्र प्रदान करताना ‘ट्यू सूद’ कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी. शेजारी डॉ. डी. के. गायकवाड, गजानन पळसे, डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, अजित थिटे, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. नमिता खोत आदी.**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टँडर्डायझेशन (आय.एस.ओ.) संस्थेकडून शिवाजी विद्यापीठाला सर्वंकष शैक्षणिक गुणवत्तेसाठी ‘आयएसओ- ९००१:२०१५’ मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यामुळे कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. हे प्रमाणपत्र प्राप्त करणारे शिवाजी विद्यापीठ देशातील चौथे व राज्यातील पहिले अकृषी राज्य विद्यापीठ ठरले आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह ट्यू सूद साऊथ एशिया कंपनीचे प्रादेशिक व्यवस्थापक सुनील जोशी, सहायक व्यवस्थापक अनिल साळवी, कोल्हापूरचे शाखाधिकारी सुजित पाटील उपस्थित होते.

कुलगुरू शिंदे म्हणाले, शैक्षणिक प्रशासन, अभ्यासक्रमांची रचना व निर्मिती, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, संशोधन प्रकल्प, शैक्षणिक उपयोजन व नवतंत्रज्ञानाचा वापर, परीक्षाविषयक कार्यपद्धती व सुधारणा, निकालाची प्रक्रिया, पदवी प्रदान प्रक्रिया या बाबींची पाहणी करून हे प्रमाणपत्र दिले आहे. पुढील वर्षी येणाऱ्या ‘नॅक’ पाहणीच्या अनुषंगाने या प्रमाणपत्राचे महत्त्व मोठे आहे. ‘आयएसओ’ प्रमाणपत्रामुळे विद्यापीठाने चालविलेल्या गुणवत्तापूर्ण वाटचालीवर शिक्कामोर्तब झाले आहे.

> ‘आयएसओ’ प्रमाणपत्र ९ सप्टेंबर २०१९ ते ८ सप्टेंबर २०२२ या तीन वर्षांसाठी आहे. संबंधित कंपनीकडून वर्षातून दोनदा मूल्यमापन करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने ३७ तज्ज्ञ अंतर्गत तपासनीसांची फळी निर्माण केली आहे.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यापीठाने दर्जावृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न चालविले आहेत. पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यापासूनच ही प्रक्रिया सुरू झाली. ती आजतागायत सुरू आहे. मानांकनामुळे एक टप्पा गाठला आहे.

‘आयक्यूएसी’चे संचालक डॉ. आर. के. कामत म्हणाले, परिमाणकारकता, कार्यक्षमता व कमीत कमी संसाधनांमध्ये जास्तीत जास्त उत्पादकता अशा विविध निकषांवर गुणवत्तेचे निर्धारण संबंधित संस्थेकडून करण्यात येते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, अजित थिटे आदी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना मिळाले कौशल्य मार्गदर्शन

## विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात 'एचआर-मीट' कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात शनिवारी 'एचआर-मीट' झाली. अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांनी कौशल्याचे मार्गदर्शन केले. उद्योग व शिक्षण यांच्यामधील तफावत व दुरी या विषयी सखोल चर्चा करण्यात आली.

प्रत्येकाच्या हाताला काम व कामाचा योग्य दाम, झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, संगणकीकरण, उपलब्ध रोजगार मनुष्यबळाच्या व्यस्त प्रमाणात नोकऱ्यामुळे वाढलेली बेरोजगारी, प्रचंड मनुष्यबळ, त्यांचे व्यवसायपण, मोठ्या प्रमाणात उत्तीर्ण होणारे विद्याविभूषित युवक-युवती यांच्या भवितव्याचा विचार आदी गोष्टीवर मान्यवरांनी विचार मांडले. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांच्या हस्ते मान्यवरांचे मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी डॉ. एस. बी साधळे, डॉ. ए. के साहू, डॉ. पी. डी पाटील, डॉ. ए. बी कोळेकर, डॉ. एस. बी. चव्हाण, डॉ. महेश साळुंखे, डॉ. रश्मी देशमुख उपस्थित होते.

पुढारी

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात कोवाड महाविद्यालयाचे यश



अडकूर : वार्ताहर

शिवाजी विद्यापीठतर्फे जयसिंगपूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये कोवाड (ता. चंदगड) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने उज्वल यश संपादन केले.

महाविद्यालयाच्या बी. ए. भाग तीन मध्ये शिकणारा जोतिबा कृष्णा गुरव याने 'नकला' अभिनय प्रकारात दुसरा क्रमांक मिळवला. त्याची फलटण येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. याबरोबरच महाविद्यालयातील कलाकारांनी अनेक कला प्रकारात सहभाग घेतला होता. यामध्ये हरियाली लोकनृत्य, समूहगान, सुगम गायन, भाषण, नक्कल यांचा समावेश होता. या सर्वांना महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. विठ्ठल दळवी, प्रा. डॉ. आर. डी. कांबळे, प्रा. एम. एस. घोळसे, प्राचार्य डॉ. एस. एम. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.